## उपोद्घात

31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151 अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांना राज्य विधानमंडळासमोर सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

या अहवालात नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971 च्या तरतुदी अंतर्गत आणि त्या अंतर्गत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक द्वारा जारी लेखापरीक्षा व लेखा नियमन, 2020 वरील नियमनांतर्गत केलेल्या राज्य शासकीय विभाग आणि स्वायत्त संस्था यांच्या कार्यनिष्पादन व अनुपालन लेखापरीक्षेचे महत्वपूर्ण लेखापरीक्षण निष्कर्ष समाविष्ट आहेत.

या अहवालात नमूद केलेली प्रकरणे ही वर्ष 2022-23 या कालावधीसंबधी चाचणी तपासणी करते वेळी निदर्शनास आलेल्या तसेच पूर्वीच्या वर्षात लक्षात आले, परंतु, मागील लेखापरीक्षा अहवालांमध्ये ज्यांचा परामर्श घेणे शक्य झाले नाही, अशा प्रकरणांपैकी आहेत; आवश्यक तेथे, वर्ष 2022-23 नंतरच्या कालावधीशी संबंधित प्रकरणे देखील समाविष्ट करण्यात आली आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी जारी केलेल्या लेखापरीक्षण मानकांच्या (मार्च 2017) अनुरूप लेखापरीक्षण करण्यात आले आहे.

**टीप: मूळ इंग्रजी अहवालावरून अनुवादित: शंका समाधानासाठी कृपया इंग्रजी अहवाल पाहावा.**